## <u>नि.क्र.५ खालील आदेश</u>

(दिनांक १६–०९–२०२३ रोजी पारीत)

प्रस्तुत अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम २३ नुसार दाखल करण्यात आला आहे. (यापुढे सोयीसाठी कायदा संबोधण्यात येते).

**<u>अर्जदारांचे कथन थोडक्यात खालील प्रमाणे :–</u>**

२. अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असून अर्जदार क्र.२ ही त्यांची मुलगी आहे. गैरअर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र.१ चे सासु–सासरे आहेत. अर्जदार क्र.१ चे लग्न गैरअर्जदार क्र.१ सोबत दि.२८/१२/२०१४ रोजी मौजा–सिंदेवाही येथे रितीरिवाजाप्रमाणे झाले. अर्जदार क्र.१ ही लग्नानंतर तिचे सासरी गडचिरोली येथे गैरअर्जदारांकडे नांदावयास गेली. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला रिसेप्शन झाल्यानंतर १ आठवडयातच शारिरीक व मानसिक त्रास द्यायला सुरुवात केली. ते अर्जदार क्र.१ ला, तु माहेरचे लोकांसोबत झोपुन आली आहे, तु डिलीव्हरी झाल्यासारखी बाई दिसतेस, तुझे बापाकडुन १ एल.सि.डी.टि.व्ही. व रु.२ लाख मागुन आण, असे म्हणत होते. त्यावेळी अर्जदार क्र.१ गैरअर्जदारांना, तिचे वडीलांची आर्थीक परिस्थीती त्यांना पैसे देण्याची नसल्याचे समजवुन सांगत होती. परंतु, गैरअर्जदारांचे वागण्यामध्ये कुठलाही बदल झाला नाही.

३. गैरअर्जदार क्र.१ ने लग्नाचे १ महिन्यानंतर अर्जदार क्र.१ ला त्याचे नोकरीचे ठिकाणी कोठी येथे राहायला नेले. त्याठिकाणी गैरअर्जदार क्र.१ हे अर्जदार क्र.१ ला नेहमी मारहान करीत होता. तसेच अर्जदार क्र.१ ने तिचेवर होत असलेले अत्याचार माहेरी सांगु नये म्हणुन अर्जदार क्र.१ ला फोन सुध्दा वापरु देत नव्हता. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही फेब्रुवारी–२०१७ मध्ये गर्भवती राहीली. तेव्हा गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला गडचिरोली येथे परत आणले. त्यानंतर गैरअर्जदार १ ने अर्जदार क्र.१ कडे लक्ष देणे सोडुन दिले. अर्जदार क्र.१ ही ४ ते ५ महिन्यांची गर्भवती असतांना गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी अर्जदार क्र.१ ला परत त्रास देणे सुरु केले.

४. गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ ला, तु माहेरचे लोकांसोबत झोपुन आली, तुला आम्ही घरी ठेवत नाही, असे म्हणायचे. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ ला, तु लग्न करुन माझ्यावर उपकार केली का, मी तुला घटस्फोट देतो, असे म्हणत होता. अर्जदार क्र.१ ही गर्भवती असतांना सुध्दा गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरु ठेवले होते. त्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला घराचे बाहेर काढले. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ची लहान बहीणीला फोन केला व, तुझ्या बहीणीला घेउन जा, म्हणुन सांगितले. त्यामुळे अर्जदार क्र.१ ला गर्भवती असतांना सुध्दा ३ ते ४ तास घराचे बाहेर बसुन राहावे लागले. त्यानंतर अर्जदार क्र.१ चे आई–वडील गडचिरोली येथे आले असता गैरअर्जदारांनी त्यांना घरी येवु दिले नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ चे आई–वडील अर्जदार क्र.१ घेवुन सिंदेवाही येथे परत आले. त्यानंतर काही दिवसांनी अर्जदार क्र.१ चे वडीलांनी अर्जदार क्र.१ ला परत गैरअर्जदार क्र.१ चे घरी गडचिरोली येथे सोडुन दिले. परंतु, गैरअर्जदारांचे वागण्यात काहीही फरक व बदल पडला नाही. अशातच एकदा गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिच्यासोबत झगडा केला व गर्भपात करीत नाही, म्हणुन अर्जदार क्र.१ चे पोटावर काडीने मारले. परंतु, अर्जदार क्र.१ ही लगेच पलटली व सुदैवाने ती काडी अर्जदार क्र.१ चे पाठीवर लागली. गैरअर्जदार हे अर्जदार क्र.१ ला गर्भवती असतांना दवाखान्यात सुध्दा नेत नव्हते.

५. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला गडचिरोली येथे प्रसुती करावयाची नाही, म्हणुन दुचाकीने सिंदेवाही येथे चौकात आणुन सोडले. दि.२३/१०/२०१५ रोजी अर्जदार क्र.१ ला अर्जदार क्र.२ ही मुलगी झाली. परंतु, गैरअर्जदार हे अर्जदाराला भेटण्याकरीता आले नव्हते. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारांना गडचिरोली येथे घरी आणले. तेव्हा अर्जदार क्र.१ ला वाटले की, मुलगी झाल्यानंतर गैरअर्जदारांचे वागण्यात काही बदल होईल. परंतु, घरी आल्यानंतर पाचव्या दिवशीच गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला हाताबुक्क्याने व पायांनी मारझोड केली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने ही सगळी घटना आपल्या माहेरी सांगायची नाही, म्हणुन, अर्जदार क्र.१ चे गळयाला चाकु लावुन मारण्याची धमकी

दिली. तसेच प्रसुतीचे एका आठवडयातच गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.१ सोबत जबरदस्तीने व क्रुरपणे शारिरीक संभोग केला.

६. अर्जदार क्र.२ चे बारसे/नामकरण करण्यात आले तेव्हा सुध्दा गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ सोबत वाद केला. त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ चे गालावर चपलीने मारले. त्यानंतर काही दिवसांनी गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ची को–या कागदावर जबरदस्तीने स्वाक्षरी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यावेळी अर्जदार क्र.१ ने स्वाक्षरी करण्यास नकार दिला असता गैरअर्जदारांनी हिला मारझोड केली. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला सिंदेवाही येथे घरी सोडुन न देता चौकात सोडुन दिले व गडचिरोलीला परत गेले. त्यानंतर काही दिवसांनी गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ ला फोनवर म्हणाले की, मी तुझ्या सोबत उगीचच झोपलो, तु आता येवु नको, नाहीतर मी मारुन टाकीन. त्यामुळे अर्जदार क्र.१ चे वडीलांनी गैरअर्जदार क्र.१ यांना फोन केला असता गैरअर्जदार क्र.१ ने त्यांना, तुझी खानदान नीच आहे, आम्हाला पोरगी दे, आम्ही पोरीला हिसकावुन घेवु, पण तुझी पोरगी घरी येवु देणार नाही, असे म्हंटले. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ चे संपुर्ण स्त्रीधन हे त्यांचेकडे ठेवुन घेतले.

७. त्यानंतर अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदारांविरुध्द गडचिरोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली. मात्र गैरअर्जदार क्र.१ हा पोलीसात असल्याने त्याने त्याचे पद व ओळखीचा वापर करुन एफ.आय.आर. नोंद होवु दिला नाही. त्यामुळे पोलीसांनी अर्जदार क्र.१ ची तक्रार नोंद न करता तिला परत पाठविले. अर्जदार क्र.१ ला माहिती मिळाली आहे की, गैरअर्जदार क्र.१ यांचे वैशाली राजेलाल राउत, या मुलीशी संबंध होते व आता गैरअर्जदार क्र.१ यांनी या मुलीसोबत गैरकायदेशीररित्या लग्न केले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला मानसिक व शारिरीक त्रास देवुन सुध्दा ती स्वतःचे वैवाहीक जीवन वाचविण्याकरीता व अर्जदार क्र.२ हिला वडीलांचे प्रेम मिळावे म्हणुन गैरअर्जदार क्र.१ यांच्या सोबत संसार करण्यास नेहमीच तयार होती व आता सुध्दा तयार आहे.

८. अर्जदार क्र.१ ला स्वतःचे व अर्जदार क्र.२ चे पोलनपोषण करण्याकरीता उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा पोलीस खात्यात नोकरीवर असुन त्यास रु.७७,०००/– महिना पगार आहे. तसेच गैरअर्जदार क्र.२ हे बी.एस.एन.एल.मध्ये नोकरीवर असुन त्यांना रु.७०,०००/– ते ८०,०००/– महिना पगार आहे. त्यांचा दुसरा मुलगा विक्रांत लसुंते हा सुध्दा जिल्हा परिषद मध्ये नोकरीवर असुन त्यास सुध्दा रु.५०,०००/– ते ६०,०००/– महिना पगार आहे. याव्यतिरिक्त गैरअर्जदार क्र.१ व २ यांना १५ ते २० एकर जमीन असुन त्याद्वारे त्यांना वार्षिक रु.५,००,०००/– ते ६,००,०००/– रुपये उत्पन्न होते. वरील सर्व उत्पन्न मिळुन गैरअर्जदार क्र.१ व २ यांचे व परिवाराचे एकुण वार्षिक उत्पन्न रु.२५,००,०००/– चे वरती आहे. त्यामुळे अर्जदारांनी गैरअर्जदारांनी किंवा त्यांचे नातेवाईकांनी त्यांचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये, त्यांना घरभाडे, वैद्यकीय खर्च, इतर जिवनावश्यक वस्तुंकरीता रु.३५,०००/– प्रति महिना देण्याचा अंतरिम आदेश करण्याची विनंती केली आहे.

९. गैरअर्जदारांनी नि.क्र.१६ वर त्यांचा जबाब दाखल करुन अर्जदारांनी त्यांचेविरुध्द केलेले सर्व आरोप नाकारले आहेत. परंतु, गैरअर्जदारांनी अर्जदारांसोबत त्यांचे नातेसंबंध मान्य केले आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी गैरअर्जदार क्र.१ हा गडचिरोली येथील पोलीस खात्यात नोकरीस असल्याचे देखील मान्य केले आहे. गैरअर्जदारांनी त्यांचे अधिकचे जबाबात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ही सुरुवातीपासुन त्याचे सोबत नांदण्यास तयार नव्हती. त्यांनी अर्जदार क्र.१ किंवा तिचे आई वडीलांना कधीही हुंडयाची मागणी केली नाही. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ला कुठल्याही प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास दिला नाही. तसेच ते अर्जदार क्र.१ ला सोडचिठ्ठी दे, असे म्हणाले नाही. याउलट अर्जदार क्र.१ ही प्रत्येकवेळेस काही ना काही कारण सांगुन, तिचे माहेरी जात असायची.

१०. सन–२०१५ पासुन अर्जदार क्र.१ ही स्वतः तिचे ईच्छेने तिला कोणताही त्रास नसतांना माहेरी निघुन गेली आहे. त्याचप्रमाणे तिने पोटगी देण्याकरीता गैरअर्जदारांवर किरकोळ फोजदारी अर्ज क्र.३८/२०१६ हे प्रकरण

दाखल केले होते. त्यानुसार गैरअर्जदार अर्जदारांना नियमीतपणे पोटगी देत आहेत. त्यामुळे अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करता येवुन पोटगी मागता येत नाही. अर्जदारांनी न्यायालयासमोर सत्यपरिस्थीती लपवुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

११. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिस लग्नामध्ये चांदीचे १ तोळयाचे जोडवे, ६ तोळयाचे चाळ, ३ ग्रॅम सोन्याचे टॉप्स व १ तोळा सोन्याचे मंगळसुत्र केले. सदर दागीने अर्जदार क्र.१ कडे आहेत. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारांना सुखासमाधानाने नांदविले व त्यांचे पालनपोषण केले. असे असतांना अर्जदार क्र.१ ही वारंवार कुणालाही न सांगता तिचे बहीणीला गडचिरोली येथे बोलावुन घ्यायची व तिचे सोबत माहेरी निघुन जायची. अर्जदार क्र.१ चे अशा वागण्यामुळे गैरअर्जदारांना त्रास होवु लागला. त्यानंतर देखील गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ ही गरोदर असतांना तिची योग्य काळजी घेतली व तिचा औषधोपचार केला. परंतु, अर्जदार क्र.१ हिला गैरअर्जदार क्र.१ सोबत नांदावयाचे नसल्यामुळे तिने गैरअर्जदारांवर खोटे आरोप करुन त्यांची समाजात बदनामी केली.

१२. दि.३०/०९/२०१५ रोजी गैरअर्जदार क्र.१ चे आजोबा मरण पावलेले असतांना अर्जदार ही तिचे आई–वडीलांसोबत स्वमर्जीने माहेरी निघुन गेली. त्यावेळी गैरअर्जदार क्र.१ हा गट्टा येथे डयुटीवर होता. गैरअर्जदार क्र.१ ला सदर बाब कळाल्यानंतर तो लगेचच अर्जदार क्र.१ घेण्याकरीता तिचे माहेरी गेला व तिला गडचिरोली येथे घेवुन आला. परंतु, त्यानंतर देखील अर्जदार क्र.१ ने माहेरी जाण्याचा हट्ट कायम ठेवला. शेवटी गैरअर्जदार क्र.१ ने तिला तिचे ईच्छेप्रमाणे माहेरी सोडले. दि.२३/१०/२०१५ रोजी गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ ला भेटण्यास गेला असता तिचे पोटात दुखु लागल्याने त्याने तिला डॉक्टरांकडे नेले. सिंदेवाही येथे बाळंतपणाची सोय नसल्यामुळे गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे भर्ती केले. त्यानंतर दि.०३/११/२०१५ रोजी गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.२ चे नामकरणाचे कार्यक्रमाचे वेळी तिला १ ग्रॅम सोन्याची जिवती व कपडे घेतले. तसेच त्याचे काका–काकुने अर्जदार क्र.२ ला १ ग्रॅम सोन्याचे

दागिने व कपडे घेतले. त्यानंतर देखील अर्जदार क्र.१ चे स्वभावात बदल झाला नाही. शेवटी गैरअर्जदारांनी त्यांचे लग्नातील मध्यस्थ बाजीराव राउत व सचिन वासेकर व अर्जदार क्र.१ चे आई–वडील यांना तिची समजुत घालण्यास कळविले. परंतु, त्यानंतर देखील अर्जदार क्र.११ चे वागणुकीत कुठलाही बदल झाला नाही. याउलट ती गैरअर्जदारांना माहेरी जाण्याचा तगादा लावु लागली. शेवटी गैरअर्जदार क्र.१ ने दि.२०/११/२०१५ रोजी अर्जदारांना तिचे माहेरी नेवुन सोडले. त्यावेळी अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदार क्र.१ ला मी दोन–तीन दिवसांनी गडचिरोलीला परत येते, असे आश्वासन दिले. परंतु, ती परत नांदावयास आली नाही. त्यामुळे गैरअर्जदारांनी मध्यस्थ बाजीराव राउत यांचे मार्फतीने अर्जदार क्र.१ ला नांदावयास येण्यास निरोप पाठविला तसेच फोनवरुन विचारणा केला. त्यावेळी अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदार क्र.१ ला अश्लील शिवीगाळ केली व मला सोडचिठ्ठी पाहिजे, असे म्हणुन नांदायला येण्यास नकार दिला.

१३. गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ चा कोणताही छळ केला नाही. तसेच तिला मारहान केली नाही. याउलट अर्जदार क्र.१ ने गैरअर्जदारांचे ईच्छेविरुध्द दि.२२/०४/२०१६ रोजी गडचिरोली पोलीस भर्ती करीता अर्ज भरला. त्यानंतर ती तिचे मैत्रीणीकडे मुक्कामाला केली. परंतु, गैरअर्जदारांचे घरी आली नाही. गैरअर्जदार क्र.२ व ३ हे म्हातारे असुन ते सन–२००८ पासुन वेगळे राहत आहेत. त्यामुळे त्यांचा या प्रकरणाशी कोणताही संबंध नाही.

१४. गैरअर्जदार क्र.१ हा सि.६० पोलीस विभागात कार्यरत असल्यामुळे त्याला बाहेरगावी जावे लागते. गैरअर्जदार क्र.१ याला त्याचे पगारातुन कपात होवुन प्रत्यक्षात रु.२६,०००/–उत्पन्न मिळते. अर्जदार क्र.१ ला त्याची जाणीव आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ वर त्याचे आई–वडीलांची जबाबदारी आहे. याउलट अर्जदार क्र.१ ही संगणक व टायपींगचे प्रशिक्षण घेते आणि शिवणक्लासचे काम करते. त्यासर्वांमधुन तिला दरमहा रु.१५,०००/– ते २०,०००/– उत्पन्न मिळते. तसेच ती शेतीचे हंगामात शेतीचे कामे करते. सबब, अर्जदार क्र.१ ही स्वतःचे व मुलीचे पालणपोषण करण्यास सक्षम आहे. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.१ ही स्वतःहुन तिचे

ईच्छेने तिचे माहेरी राहते. त्यामुळे तिला प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. अर्जदारांनी गैरअर्जदारांविरुध्द खोटे आरोप करुन त्यांना त्रास देण्याकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. सबब, त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

१५. अभिलेखावरील माहीती लक्षात घेता माझे समक्ष खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसा खालील प्रमाणे देत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. अर्जदार हे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे अंतरिम आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...अंशतः होकारार्थी |
| २. आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

१६. अर्जदार व गैरअर्जदार यांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी अर्ज व जबाबातील कथनांप्रमाणे युक्तीवाद सादर केला. अर्जदारांनी त्यांचे अर्जातील कथनांचे अनुषंगाने त्यांचे आधार कार्ड, अर्जदार क्र.२ चे जन्म प्रमाणपत्र व माहिति अधिकार अधिनियमांतर्गत मिळालेली माहिती इ. च्या छायांकीत प्रती दाखल केल्या आहेत. याउलट गैरअर्जदारांतर्फे गैरअर्जदार क्र.१ चे पगाराचे विवरणाची छायांकीत प्रत दाखल करण्यात आली आहे.

**मुद्दा क्र.१ करिता –**

१७. अर्जदारांचे कथनांवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी असुन त्यांचे लग्नसंबंध आज रोजी कायम आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.२ ही गैरअर्जदार क्र.१ ची मुलगी आहे. तसेच अर्जदार क्र.१ व २ हया दोघीही आज रोजी अर्जदार क्र.१ चे माहेरी राहत आहेत. अर्जदाराने केलेल्या कथनांवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ हिला तिचे वडीलांकडुन वेळोवेळी पैसे आणण्यासाठी त्रास दिला आहे. तसेच तिला इतर क्षुल्लक कारणांवरुन मारहान करुन शिवीगाळ केली आहे. त्याचप्रमाणे गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ चे चारित्र्यावर संशय घेवुन तिचा वेळोवेळी अपमान केला आहे. तसेच

गैरअर्जदार क्र.१ चे परस्त्रीसोबत विवाहबाहय संबंध होते. सबब, वरील सर्व कारणांमुळे गैरअर्जदारांनी अर्जदाराला मानसिक व शारिरीक त्रास देवुन तिचा शारिरीक, मानसिक, शाब्दीक, आर्थीक व भावनिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ हिला तिचे मुलीला घेवुन तिचे आई–वडीलांकडे रहावे लागत आहे.

१८. प्रस्तुत प्रकरणात दोन्ही अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ पासुन वेगळे राहत आहेत, ही बाब वादातीत नाही. अर्जदार क्र.१ ला गैरअर्जदार क्र.१ पासुन अर्जदार क्र.२ ही मुलगी आहे. त्याचप्रमाणे कोणतीही भारतीय स्त्री सबळ कारणाशिवाय आपले पतीला सोडुन आपले मुलीसह आई–वडीलांकडे माहेरी राहणार नाही. अर्जदार क्र.१ ला त्रास असल्याखेरीज ती गैरअर्जदार क्र.१ सोडुन आपले माहेरी राहणार नाही. सबब, मला अर्जदारांनी त्यांचे अर्जात केलेली कथने प्रथमदर्शनी विश्वसनीय वाटतात. अर्जदार क्र.१ हिचे अर्जातील कथनावरुन ती गैरअर्जदारांच्या कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१९. त्याचप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांचे कथनावरुन असे दिसुन येते की, अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ विरुध्द या न्यायालयात किरकोळ फौजदारी प्रकरण क्र.३८/२०१६ दाखल केले होते. सदर प्रकरण हे फौ.प्र.सं.कलम १२५ नुसार पोटगी मिळण्याकरीता दाखल करण्यात आले होते. त्यावरुन गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदारांचे पालनपोषण करण्यास दुर्लक्ष केल्याचे दिसुन येते. त्याकारणावरुन सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र.१ विरुध्द आदेश पारीत करण्यात आला असल्याचे नाकारता येत नाही. सबब, अर्जदारांनी त्यांचे अर्जात केलेल्या कथनांप्रमाणे त्यांना गैरअर्जदारांकडुन शारिरीक व मानसिक त्रास झाल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

२०. गैरअर्जदारांचे विद्वान वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणात संरक्षण अधिकारी यांचा अहवाल दाखल नाही. त्याचप्रमाणे अर्जदारांनी त्यांचे अर्जात ८ वर्षापुर्वीचे घटनांचा उल्लेख केला आहे. तसेच अर्जदार व गैरअर्जदार यांचे परिस्थीतीचे आकलन पुर्वीचे प्रकरणामध्ये न्यायालयाने केले आहे. अर्जदारांनी

त्या प्रकरणाचा उल्लेख त्यांचे प्रकरणात केला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज चालविता येत नाही. याउलट अर्जदारांचे विद्वान वकीलांनी असा युक्तीवाद सादर केला की, प्रस्तुत अर्ज चालविण्याकरीता संरक्षण अधिकारी यांचा अहवाल दाखल करणे गरजेचे नाही. अर्जदारांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्रात पुर्वीचे व प्रलंबित खटल्यांचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणाला विलंबाचा कायदा लागु होत नाही. तसेच अर्जदारांना कायद्यानुसार वेगवेगळे खटले दाखल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे न्यायालयास सदरचा अर्ज चालविता येतो.

२१. अर्जदारांनी त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र नि.क्र.१५ वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार व गैरअर्जदार यांचेतील निकाली निघालेले व प्रलंबित खटले यांचा उल्लेख केल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण या कायद्याखाली दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांना विलंबाचा कायदा लागु होत नाही. तसेच अर्जदारांना कायद्याने दिलेल्या अधिकारानुसार ते प्रत्येक कायद्याखाली वेगवेगळी प्रकरणे दाखल करु शकतात. सबब, उपरोक्त कथनांवरुन गैरअर्जदारांचे विद्वान वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राहय धरता येत नाही.

२२. त्याचप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने *प्रभा त्यागी –वि– कमलेश देवी, फौजदारी अपील क्र.५११/२०२२,* या न्यायनिर्णयात कौटुबिंक हिंसाचार कायद्यांतर्गत कोणतीही कार्यवाही करण्यापुर्वी कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल विचारात घेण्याची गरज आहे काय, याबाबत आपले मत व्यक्त केले आहे. सदर प्रश्नाचे उत्तरार्थ मा.सर्वोच्च न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम १२ हे न्यायदंडाधिका–याने या कायद्यांतर्गत कोणताही आदेश पारीत करण्यापुर्वी संरक्षण अधिकारी किंवा सेवा पुरविणारे यांचा कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल विचारात घ्यावा, असे बंधनकारक करत नाही. पुढे मा.न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले आहे की, न्यायदंडाधिकारी हे कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाला अभावी कौटुंबिक हिंसाचार कायद्यांतर्गत कोणताही एकतर्फा किंवा अंतरिम तसेच अंतिम आदेश पारीत करण्यास सक्षम आहेत. सबब, हे न्यायालय संरक्षण अधिकारी यांच्या कौटुंबिक

हिंसाचार घटना अहवालाचे अभावी देखील प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत करु शकते. त्यामुळे, प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत करतेवळी अभिलेखावर कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल दाखल असावा, हे बंधनकारक नाही. तसेच या न्यायालयाने प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत करतेवेळी कौटुंबिक हिंसाचार अहवाल विचारात घेणे, हे बंधनकारक नाही. सबब, वरील न्यायनिर्णयांमधील निष्कर्षांवरुन गैरअर्जदारांचे उपरोक्त विद्वान वकीलांचा उपरोक्त युकित्वाद ग्राहय धरता येत नाही.

२३. प्रस्तुत अर्जात अर्जदारांनी त्यांना तात्काळ दिलासा म्हणुन गैरअर्जदारांनी त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास देवु नये आणि त्यांना घरभाडे, वैद्यकीय खर्च व उदरनिर्वाहाकरीता एकत्रीत दरमहा रु.३५,०००/– अंतरिम पोटगी द्यावी, असा अंतरिम आदेश देण्याची प्रार्थना केली आहे. अर्जातील कथनांवरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, गैरअर्जदारांनी अर्जदार क्र.१ चा कौटुंबिक हिंसाचार केला आहे. त्यामुळे त्याबाबत तात्काळ आदेश पारीत करणे उचीत ठरते. सबब, कलम १८ नुसार गैरअर्जदारांनी किंवा त्यांचे नातेवाईकांनी अर्जदार क्र.१ शी वैयक्तीक, लेखी, दुरध्वनीद्वारे किंवा अन्य कुठल्याही प्रकारे संपर्क करुन तिचा कौटुंबिक हिंसाचार करु नये, याबाबत अंतरिम आदेश देणे उचीत ठरते. त्याचप्रमाणे अभिलेखावरील कथनांवरुन असे दिसुन येते की, अर्जदार हे आज रोजी अर्जदार क्र.१ चे माहेरी राहत आहे. त्यामुळे त्यांना घरभाडे देण्याची अथवा त्यांचेकरीता सामाईक घराची व्यवस्था करणे आवश्यक नाही.

२४. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार क्र.१ चा पती असुन त्याने अर्जदारांना आर्थीक सहाय्य पुरविणे ही त्याची नैतिक व कायदेविषयक जबाबदारी आहे. त्यामधुन त्याची सुटका होत नाही. गैरअर्जदार क्र.१ हा पोलीस खात्यात नोकरीस असल्याबाबत वाद नाही. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न दर्शविण्याकरीता कोणतेही दस्तऐवज दाखल केले नाही. परंतु, गैरअर्जदारांनी नि.क्र.१८ नुसार गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न दर्शविण्याकरीता त्याचे एप्रिल–२०२३ या महिन्याचे पगाराचे विवरण दाखल केले आहे. त्यानुसार गैरअर्जदार क्र.१ ला एकुण रु.५४,१३९/– पगार असुन त्यामधुन शासकीय वजावट, विमा व इतर वसुली

वगळता गैरअर्जदार क्र.१ ला निव्वळ रु.२४,५९९/– एवढे दरमहा पगाराचे उत्पन्न मिळते. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ ला आज रोजी ठोस उत्पन्न मिळत असल्याचे दिसुन येते.

२५. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, किरकोळ फौजदारी प्रकरण क्र.३८/२०१६ या प्रकरणामध्ये या न्यायालयाने गैरअर्जदार क्र.१ यास अर्जदार क्र.१ हिला रु.३,०००/– व अर्जदार क्र.२ हिला रु.१,५००/– एवढी दरमहा पोटगी देण्याचे आदेशीत केले आहे. सदर आदेश हा फौ.प्र.सं.कलम १२५ नुसार पारीत केला आहे. प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत करतेवेळी उपरोक्त प्रकरणातील आदेश विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. उपरोक्त आदेश हा सन–२०१८ मध्ये पारीत केल्याचे दिसुन येते. सदर आदेश गैरअर्जदार क्र.१ चे तत्कालीन उत्पन्न व अर्जदारांच्या त्यावेळच्या गरजा या आधारावर पारीत केला असल्याचे नाकारता येत नाही. आज तो आदेश पारीत होवुन जवळपास ५ वर्ष पुर्ण होत आहेत. दरम्यानचे काळात अर्जदारांचे गरजा आणि गैरअर्जदार क्र.१ चे उत्पन्न देखील वाढले आहे. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.२ ही आज रोजी शिक्षण घेत असल्याचे दिसुन येते. सबब, अर्जदार क्र.१ ला अर्जदार क्र.२ चे शिक्षण व पालनपोषणाकरीता वाढीव खर्च लागत असल्याचे नाकारता येत नाही.

२६. त्याचप्रमाणे अर्जदार क्र.१ ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी व अर्जदार क्र.२ ही त्याची मुलगी असुन त्यांचेतील संबंध आजरोजी अस्तित्वात आहेत. अर्जदार व तिचे मुलीचे पालनपोषणाची आणि उदरनिर्वाहाची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची आहे. अर्जदार क्र.१ ही तिचे मुलीसोबत तिचे आई–वडीलांकडे राहत असल्यामुळे तिला कोणाचे आश्रयाने जिवन जगावे लागु नये म्हणुन त्यांचे उदरनिर्वाहाची व्यवस्था करणे ही गैरअर्जदार क्र.१ ची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे, अर्जदारांना अंतरिम पोटगी नाकारता येवू शकत नाही. अर्जदारांचे वाढीव गरजा विचारात घेता अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ कडुन अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र ठरतात. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ चे वाढीव उत्पन्न लक्षात घेता तो अर्जदारांना पोटगी देण्यास सक्षम असल्याचे दिसुन येते. सबब, गैरअर्जदार क्र. १ ने

अर्जदार क्र.१ हिला दरमहा रु.२,०००/– व अर्जदार क्र.२ हिला दरमहा रु.१,५००/– अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन ते प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत देणे न्यायोचित होईल. म्हणुन, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २ करिता–</u>**

२७. मुद्दा क्र.१ चे निष्कर्षावरुन प्रस्तुत अर्ज अंशतः मंजुर करणे न्यायोचीत ठरतो. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष लक्षात घेत, मी मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षात पुढील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारांनी अर्जदारांना कोणत्याही प्रकारचा कौटुंबिक हिंसाचार करु नये, असा अंतरिम आदेश देण्यात येतो.

३. गैरअर्जदार क्र.१ ने प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासुन प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अर्जदार क्र.१ हिस रु.२,०००/– दरमहा (अक्षरी रुपये दोन हजार फक्त) आणि अर्जदार क्र.२ हिस रु.१,५००/– दरमहा (अक्षरी रुपये एक हजार पाचशे फक्त) अंतरिम पोटगी म्हणुन द्यावी.

४. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना व संरक्षण अधिकारी यांना विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSALE

**(शहाजी दत्तराव भोसले)**

दिनांक–१६/०९/२०२३

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सिंदेवाही

मी, प्रसाद सुरेशराव पोहनकर, लघुलेखक (दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), सिंदेवाही) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.